# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र ११२ दिनांक- २३/०४/२०२१

## अर्नाळा पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रातील हॉस्पीटलला लागलेल्या आगीमध्ये १४ रूग्ण मृत्यूमुखी व ३ रूग्ण जखमी.

आज दिनांक २३/०४/२०२१ रोजी रात्रौ ३:०० वा.चे सुमारास,अर्नाळा पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रातील तिरुपती नगर विरार (पश्चिम) येथील रॉयल अकॅडमी शाळेजवळील, संपूर्ण कोविड रूग्णाकरिता राखीव असणाऱ्या चारमजली विजय वल्लभ हॉस्पिटलमध्ये दुसऱ्या मजल्यावर अचानक आग लागली.

सदर ठिकाणी तत्काळ पोलीस प्रशासन व अग्निशमन दलाच्या ३ गाडया व जवान यांनी घटनास्थळावर जावून मदतकार्य सुरू केले. सदर ठिकाणी कोविड सेंटर असल्याने तेथील सर्व रुग्ण कोविडविषयक दवाउपचाराकरिता रुग्णालयात दाखल झालेले होते. शर्थीचे प्रयत्न करून सुमारे ०५:२० वा चे सुमारास आगीवर नियंत्रण आणण्यात प्रशासनाला यश येवून सदर आग विझवली.

विजय वल्लभ हॉस्पिटलमध्ये एकुण ८५ कोविड रूग्ण, दवाउपचार घेत होते.सदर हॉस्पिटलचे अतिदक्षता गृहामध्ये एकुण १७ रुग्णावर उपचार चालू होते. अतिदक्षता विभागामध्ये अचानक आग लागलेली दिसून आली. अतिदक्षता विभागाने पेट घेतला होता.अतिदक्षता विभागातील एकुण १७ रुग्णापैकी ४ रूग्णांना बाहेर काढण्यात यश आले. परंतु १३ रुग्णांचा आगीने होरपळून व धुरामूळे गुदमरून जागीच मृत्यू झाला. आहे.सर्व मृत रुग्णांची ओळख पटलेली आहे.तसेच प्राण वाचलेल्या ०४ रूग्णापैकी कार्डीनल हॉस्पीटल येथे दवोपचार घेणारे श्री. शिवाजी पांडूरंग विलेकर वय ३६ वर्षे हे दवाउपचारादरम्यान मयत झाले आहेत. धुरामूळे पहिल्या व दुसऱ्या माळयावरील एकुण ७१ रुग्णांना श्वसनाचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना इतर हॉस्पिटल मध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे

उपरोक्त ७१ रुग्णांपैकी १ रुग्ण गृह विलीनीकरणात आहेत. सदर रुग्णांना ईतरत्र हॉस्पिटल मध्ये दवाउपचारा करीता प्रशासनाने दाखल केले आहे. पोलीस विभागाने सर्व रुग्णांना सुरक्षितरित्या,विनाअडथळा त्यांचे नातेवाईकांचे मागणीप्रमाणे हॉस्पीटल किंवा निवासस्थानी पोहचविले आहे.सर्व हॉस्पीटल रिकामे करण्यात आले आहे.न्यायवैदयकीय टीम तसेच विद्युत निरीक्षक घटनास्थळी उपस्थित आहेत. जखमींना पुढील दवाउपचाराकरिता इतरत्र दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आहे.तेथे जखमींवर दवोपचार चालू आहेत.

Scanned with CamScanner

घटनास्थळी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी तत्काळ घटनास्थळाला भेट देवून मार्गदर्शन केले. पोलीस उपाआयुक्त परिमंडळ-२, पोलीस उपाआयुक्त परिमंडळ-३, सहायक पोलीस आयुक्त विरार,सहायक पोलीस आयुक्त तुळींज तसेच अर्नाळा पोलीस ठाणे व त्यांचा स्टाफ आणि राज्य राखीव पोलीस दलाचे जवान बंदोबस्त कामी तैनात आहे.मदतकार्य अविरतपणे चालु राहण्यासाठी आग्निशामक दल,महापालिका प्रशासन,जिल्हा प्रशासन यांचेशी समन्वय ठेवून कामकाज चालु आहे.

सदर हॉस्पिटलला लागलेली आग व घडलेली दुर्घटना या विषयी वसई -विरार शहर महानगरपालिकेचे सहा.आयुक्त,प्रभाग समिती "अ"अंगाई जयसिंगराव सांळुंखे यांनी फिर्याद दिलेने अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा.रजि.नं१३८/२०२१, भा.द.वि.सं कलम ३०४,३३७,३३८,३४ प्रमाणे,विजय वल्लभ हॉस्पीटल,विरार (पश्चिम)चे व्यवस्थापक,डॉक्टर व कर्मचारी यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास,श्री.डॉ.महेश पाटील, पोलीस उपआयुक्त(गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली श्री प्रमोद बडाख पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा कक्ष-३ विरार हे करीत आहेत.

Scanned with CamScanner